**नियमित दिवाणी दावा क्र. १५/२०१८**
**निशाणी ३७ लगत**

**वादी तर्फे साक्षीदार क्र.१ स्वतः वादी रामचंद्र भागा बोडेकर यांचा पुढील उलटतपास शपथेवर, प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे विधीज्ञ श्री. एस. एच. पेडणेकर यांचेकडून–**

१६. हे म्हणणे खरे नाही की, १९५५ सालापासून दावा मिळकतीला लखू धाकला बोडेकर त्यांच्या पश्चात बाबू बोडेकर यांचे नाव होते. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही भात शेतीची मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत भात लागवड केली जाते असाच उल्लेख दावा मिळकतीच्या सातबारा उताऱ्यावर आहे. दावा मिळकतीत काजू व कलमे असल्याबाबत सातबाऱ्यात उल्लेख आहे.

१७. हे म्हणणे खरे आहे की, बाबू लखू बोडेकर हे मुंबई, महानगर पालीकेत नोकरीस होते. त्यांचा मृत्यू दिनांक १७/०९/१९८९ रोजी झाला, असे काही मला माहित नाही.

१८. दावा मिळकतीला माझे नाव आकारफोडपत्रकावरुन लागले असे काही मला माहित नाही. सर्व्हे नं. ३२ हिस्सा नं. ०२ ची मिळकत या दाव्याचा भाग नाही.

१९. हे म्हणणे खरे आहे की, बाबू लखू बोडेकर यांचे आम्ही वारस आहोत असे ठरवून मिळावे यासाठी बाबू लखू बोडेकर यांची विधवा व मुले यांनी या न्यायालयाकडे अर्ज केला होता. त्या अर्जाला आम्ही आक्षेप घेतला नाही, या तुमच्या सुचनेबाबत माझे सांगणे की, त्या अर्जासंबंधी आम्हाला कळले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत सर्व्हे नं. ३२ हिस्सा नं. ०३अ ला आजपर्यंत माझे नाव नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील भागा बोडेकर तसेच त्यांचे भाऊ लखू बोडेकर हे एकत्रीत असल्यापासून त्यांच्या दावा मिळकती व्यतीरिक्त सुध्दा इतर काही मिळकती आहेत.

२०. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ०१ ते ०४ या दावा मिळकतीत कधीही आल्या नाहीत असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळतीचा दस्त मी भरल्या बाबत कोणताही कागद याकामी मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मिळकतीतील काही भाग स्वखर्चाने व अंगमेहनतीने मी विकसीत केला आहे, असे मी खोटेच सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत मी व प्रतिवादी क्र. ०५ ने काजू

लागवड केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, १९५५ सालापासून भागा व लखू हे स्वतंत्र व विभक्त होते व त्यांचा एकत्रात कोणताही व्यवहार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, बाबू लखू बोडेकर हे बेपत्ता झाले आहेत व त्यांच्या ऐवजी माझे नाव मिळकतीला लावावे असा फेरफार होण्यासाठी मी अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, तसा अर्ज मी दिला होता व तो दिनांक २२/०७/१९७६ रोजी फेटाळण्यात आला.

२१. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत रत्नागिरी ते नागपूर महामार्गासाठी संपादीत केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबतचा मावेजा मला एकटयाला मिळावा यासाठी मी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, लखू व भागा यांच्या दावा मिळकती व्यतीरिक्त इतर काही एकत्रातील मिळकती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

BALIRAM DATTATRAYA TARE
Digitally signed by BALIRAM DATTATRAYA TARE
Date: 2023.06.07 16:42:53 +0530

(ब. द. तारे)

दि.०७/०६/२०२३ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, देवरुख

**CERTIFICATE**

Evidence in RCS no. 15-2018

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 07/06/2023 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 07/06/2023 |
| Evidence uploaded on | : | 07/06/2023 |